**अमरावती महानगरपालिका, अमरावती**
**दिनांक १४/२/२०२४ रोजी प्राप्त प्रशासकीय विषय**

**(प्रशासकीय विषय)**

**विषय क्रमांक १६४ -** अमरावती स्थित मौजे - रहाटगांव, सर्व्हे. नं. 213/3 मधील क्षेत्रफळ 0 हे. 39 आर जागा कृषी वापर क्षेत्रातून वगळून रहिवास वापर क्षेत्रात समाविष्ट करण्याबाबत म.प्रा.नि.व.न.र. अधि. 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदल करणे बाबत.

**ठराव क्रमांक १६४ -** अमरावती स्थित मौजे - रहाटगांव, सर्व्हे नं. 213/3 मधील क्षेत्रफळ 0 हे. 39 आर जागा हि खाजगी मालकीची आहे. अमरावती शहराच्या मंजुर विकास योजना (सु.) नुसार सदर जागा कृषी वापर क्षेत्रात दर्शिवलेली आहे. मौजे - रहाटगांव, सर्व्हे नं. 213/3 मधील क्षेत्रफळ 0 हे. 39 आर जागा कृषी वापर क्षेत्रातून वगळून रहिवास वापर क्षेत्रात समाविष्ट करण्यास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधि. 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदल करण्यास शहर सुधार समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. तथापी सदर समिती सद्यस्थितीत कार्यरत नसल्याने, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार प्राधिकरणाचे सर्व अधिकार प्रशासन यांचे कडे असल्याने सदर प्रस्ताव मंजुरी प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधि. 1966 चे कलम 37 नुसार नागरिकांचे हरकती व सुचना नोंदवुन त्याबाबत फेरबदलाचा प्रस्ताव तयार करून अंतिम ठराव पुन्हा मान्यते करीता नियोजन प्राधिकरणाकडे न पाठवता सरळ फेरबदल प्रस्ताव शासनाकडे सादर करावयाचे अधिकारही प्रशासनास देण्यात यावे. सदर प्रस्तावास मा.आयुक्त यांनी दि. १४/२/२०२४ ला मान्यता प्रदान केलेली आहे.

उपरोक्त प्रशासकीय विषय शहर सुधार समितीच्या मंजुरीस्तव सादर करण्यात आला आहे. परंतु, सद्यःस्थितीत सर्वसाधारण सभा व विषय समित्या अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजुर व कायम

**स्वा./-**
**नगरसचिव,**
**महानगरपालिका,अमरावती**

**स्वा./-**
**प्रशासक,**
**महानगरपालिका,अमरावती**

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती.